महाराष्ट्र शासन

**जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी यांचे कार्यालय रत्नागिरी,**

**(पुरवठा शाखा)**

दुरध्वनी क्रमांक:-०२३५२-२२२४१२ ई-मेल- dso_ratnagiri@rediffmail.com

क्र./पुरवठा- प्रशासन/२/कावि- को.वा.अधि./२०२० दिनांक- २३/०३/२०२०

**वाचले -** १. आपत्ती व्यवस्थापन कायदा, २००५ कलम ३४

२. साथरोग प्रतिबंधात्मक कायदा -१८९७

३. सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील अधिसुचना क्र. करोना२०२०/ प्र.क्र. ५८ /आरोग्य-५ दिनांक १४ मार्च २०२०

४. या कार्यालयाकडील आदेश क्र. उचिशा/पोल-२/ज.बं.आ/१४४/२०२० दि . २२/०३/२०२०

५. या कार्यालयाकडील आदेश क्र. ससाशा/कार्या-१३/करोना विषाणू/वहातूक/२०२० दि . २३/०३/२०२०

**आदेश -**

ज्याअर्थी, संदर्भिय क्रमांक ३. अन्वये मा. प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग मुंबई यांनी राज्य शासनाने कोरोना विषाणूचा ( कोव्हिड १९ ) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ दिनांक १३ मार्च २०२० पासून लागू करुन खंड २, ३ व ४ मधील तरतूदी निर्गमित केली आहे.

आणी ज्याआर्थी संदर्भित क्रमांक ४ अन्वये रत्नागिरी जिल्हयामध्ये फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ प्रमाणे करोना विषाणू संसर्ग झालेल्या रुग्णापासून व त्यांच्या संपर्कात आलेल्या अन्य इसमांपासून दुस-या इसमांना विषाणूचा प्रार्दुभाव होवू नये या करिता दिनांक २२/०३/२०२० रात्री ९-०० वाजले पासून लोकांना सार्वजनिक ठिकाणी एकत्रित येणेपासून व लोकांची वाहतूक करणारी वाहाने यांना ये-जा करणेस प्रतिबंध केलेला आहे.

आणी ज्याआर्थी संदर्भित क्रमांक ५ अन्वये रत्नागिरी जिल्हयातील कोणत्याही रस्त्यावर, सार्वजनिक वाहतूकीच्या रस्त्यावर, गल्लोगल्ली या ठिकाणी सर्व प्रकारची तीन चाकी वाहने, हलकी वाहने, मध्यम वजनाची वाहने, जड वाहतूकीची वाहने यांचा प्रवासी व माल वाहतूक यासाठीचा वापर दिनांक २३/०३/२०२० पासून प्रतिबंधित करण्यात आलेला आहे.

त्याअर्थी, मी लक्ष्मीनारायण मिश्रा, जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी , रत्नागिरी, मला प्राप्त अधिकाराचा वापर करुन **जिल्हयातील सर्व पेट्रोल पंपावर सर्व प्रकारची तीन चाकी वाहने, हलकी वाहने, मध्यम वजनाची वाहने, जड वाहतूकीची वाहने यांचा प्रवासी व माल वाहतूक यासाठी पेट्रोल व डिझेल देणेस दिनांक २३/०३/२०२० पासून पुढील आदेश होईपर्यंत प्रतिबंध करणेत येत आहे.**

Scanned by CamScanner

**सदर आदेश खालील बाबतीत लागू होणार नाही.**

१. शासकीय / निमशासकीय वाहने व कर्मचारी यांची कर्तव्यावर असतांना वापरण्यात येणारी खाजगी वाहने ( ओळखपत्र व गाडीचे आर.सी वरील नाव पाहून )

२. तातडीचे रुग्ण वाहतूक व हॉस्पीटल मधील डॉक्टर व पॅरामेडिकल स्टाफ.

३. अत्यावश्यक सेवा उदा. ( विज, पाणीपुरवठा, दूरसंचार, अग्नीशामन, बँक, एटीएम, टपाल सेवा, सांडपाणी निचरा व स्वच्छता व्यवस्थापन, राष्ट्रीय व अंतरराष्ट्रीय पातळीवरील पायाभूत विकासाशी संबधित उदयोग सीएनआय) कर्तव्यावर असल्यास

४. जिवनावश्यक वस्तू व सेवा यांची वाहतूक (अन्नधान्य, भाजीपाला, फळे, दूध, किराणमाल इ. सारख्या सेवा पुरविणा-या आस्थापना.

५. दवाखाने, वैदयकिय केंद्र, औषधी दुकाने व आरोग्य विषयक सेवा पुरविणा-या आस्थापना

६. विदयुत पुरवठा,ऑईल व पेट्रोलियम व उर्जा संसाधने पुरविणा-या आस्थापना.

७. अत्यावश्यक सेवा देणा-या आयटी आस्थापना.

८. प्रसार माध्यामे व त्यांचे प्रतिनिधी.

९. जिल्हाधिकारी यांनी परवानगी दिलेली वाहने.

वर नमूद अनुक्रमांक १ ते ९ सेवा पुरविणा-या आस्थापनांच्या वाहनांना सदर आदेश लागू राहाणार नाही. तसेच त्यांना इंधन भरण्यासाठी वेळेचे बंधन असणार नाही. या आदेशावर तात्काळ अंमल बजावणी करण्यात यावी.

टिप- **१. सर्व प्रकारचे दुचाकी वाहनांना सकाळी १०-०० ते दुपारी ०१-०० व दुपारी ०४-०० ते सायंकाळी ६-०० यावेळेत इंधन देण्यात यावे**

**२. वर नमूद प्रमाणे सवलत दिलेल्या अधिकारी व कर्मचारी तसेच खाजगी व्यक्ती यांनी ओळखपत्रे व सदर विशेष कार्यासाठी नेमणूकीचे आदेश तसेच रुग्णांनी आवश्यक कागदपत्रे वाळगणे बंधनकारक आहे.**

(लक्ष्मीनारायण मिश्रा)
**जिल्हाधिकारी, व जिल्हादंडाधिकारी**
**रत्नागिरी**

**प्रत -** १. जिल्हा पोलीस अधिक्षक, रत्नागिरी

२/- सकाळी १० ते १२ व दुपारी ३-०० ते ५-०० पेट्रोल पंपावर गर्दी होत असेल अशा गर्दीचे ठिकाणी कडक कारवाई करावी.

२. सर्व उपविभागिय दंडाधिकारी

३ .सर्व तालुकादंडाधिकारी

४ सर्व पेट्रोल पंप धारक.

२/- सदरचे आदेशाची प्रसिध्दी आपले पेट्रोल पंपावर दर्शनीभागी सर्वांना दिसेल अशा ठिकाणी मोठा बोर्ड लावून करण्यात यावी.

Scanned by CamScanner